M. S. Board Of Secondary And
Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board, Vashi,
Navi Mumbai-४०० ७०३.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.

क्र. मुंविमं/मा.प./ ३९९६
वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.
दिनांकः- १३ /० ७/२०२६

प्रति,

१. मा.महासंचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई-३२.
२. मा.विभागीय प्रसिध्दी उपसंचालक, मुंबई विभाग.
३. मा.संचालक, दुरदर्शन केंद्र, मुंबई-४०० ०३२.
४. मा.संचालक, आकाशवाणी केंद्र, मुंबई केंद्र नवीन प्रसारण भवन, मुंबई-४०० ०२०.
५. सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, मुंबई व उपनगरे ठाणे,रायगड, पालघर जिल्हा.
६. मा.संपादक, सर्व वृत्तपत्रे.

विषय: जून–जुलै २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेचा ऑनलाईन निकाल करणेबाबत.

महोदय,

जून–जुलै २०२६मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक, शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेचा निकाल जाहीर करणेबाबतच्या प्रकटनाची प्रत सोबत जोडली आहे. सदर प्रकटनास आपल्या कार्यक्षेत्रातील वृतपत्र, वृत्तवाहीन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रानी बातम्याचेवेळी विनामुल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

(ज्योत्स्ना शिंदे–पवार)
विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई ४००७०३.

Letter Head Ax Makhajankar sir
Telephone : २७६५२४४५,२७६६२५०४,२७८८१०७७,२७८८१०७५,२७८९९९८७ * Fax : २७६५९४९१/२७८८१३४९
Email : sschsc.mumbaiboard@gmail.com * Website : www.sscboardmumbai.in

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४

प्रकटन

विषय : जून-जुलै २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) पुरवणी परीक्षेचा निकाल जाहीर करणेबाबत...

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत **माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) पुरवणी परीक्षा दिनांक १६ जून, २०२६ ते दिनांक ३० जून, २०२६ व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) ची पुरवणी परीक्षा दिनांक १६ जून, २०२६ ते ०८ जुलै, २०२६ या कालावधीत** आयोजित करण्यात आली होती.

सदर परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात येत असून निकालाची कार्यपध्दती व त्याच्या कार्यवाहीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या नऊ विभागीय मंडळांमार्फत **जून-जुलै २०२६** मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) पुरवणी परीक्षेचा ऑनलाईन निकाल पुढील संकेतस्थळांवर **मंगळवार, दिनांक १४/०७/२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता** जाहीर करण्यात येत आहे.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा	माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा
https://www.mahahsscboard.in	

२) ऑनलाईन निकालानंतर लगेचच दुसऱ्या दिवसापासून माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) पुरवणी परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यास स्वत:च्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित केलेल्या गुणांची गुणपडताळणी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने **https://www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना स्वत: अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यासाठी आवश्यक अटी/शर्ती व सूचना संकेतस्थळावर देण्यात आलेल्या आहेत. **गुणपडताळणी व छायाप्रतीसाठी बुधवार, दिनांक १५/०७/२०२६ ते शुक्रवार, दिनांक २४/०७/२०२६ पर्यंत अर्ज ऑनलाईन पध्दतीने करता येईल.** त्यासोबतच ऑनलाईन पध्दतीने शुल्क (Debit Card/ Credit Card/ UPI/ Net Banking) याद्वारे भरता येईल.

३) जून-जुलै २०२६ पुरवणी परीक्षेच्या उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्यासाठी मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य असून छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून त्यापुढील कार्यालयीन कामाच्या पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन विहित नमुन्यात विहित शुल्क भरुन संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील. ज्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करावयाचे असेल त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

४) जून-जुलै २०२६ च्या इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेमध्ये सर्व विषयांसह प्रथम प्रविष्ट होऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांची संपादणूक सुधारण्यासाठी **श्रेणी/गुणसुधार** (Class Improvement Scheme) योजनेअंतर्गत परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी तरतुदीच्या अधीन राहून लगतच्या तीन संधी (फेब्रुवारी-मार्च २०२७, जून-जुलै २०२७ व फेब्रुवारी-मार्च २०२८) उपलब्ध राहतील.

५) फेब्रुवारी-मार्च २०२७ मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस ज्या विद्यार्थ्यांना प्रविष्ट व्हावयाचे आहे अशा नियमित, पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी, श्रेणी सोडून प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ट होणारे व III (औद्योगिक प्रशिक्षण संस्था) द्वारे Transfer of Credit घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने स्विकारली जातील. त्यांच्या सारखा मंडळामार्फत स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येतील.

दि. १३/०७/२०२६

(डॉ.दिपक माळी)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४.